करून रिक्षा चालकाला अटक करण्यात आली आहे.

याची चौकशी करत होत्या.

बाहेर काढला.

# नवापुरातील पूरग्रस्त ५० कुटुंबीयांना मदतीचा हात



नवापूर, दि. २९ - नवापूर तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या ५० कुटुंबीयांना चादर, बेडशीट्स, टॉवेल, ब्लँकेटचे वाटप करण्यात आले आहे. ही मदत डॉक्टर उल्हास वसावे यांच्या माध्यमातून जे. व्ही. गोकल चॅरिटी ट्रस्ट व क्रिष्णा फाऊंडेशनच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

१७ ऑगस्ट रोजी नंदुबार जिल्ह्यासह नवापूर तालुक्यात धो धो पाऊस पडला. परिणामी पुरामुळे अनेक कुटुंब बेघर झाली. हीच बाब लक्षात घेऊन डॉ. उल्हास वसावे यांनी पुढाकर घेऊन जे. व्ही. गोकल चॅरिटी ट्रस्ट व क्रिष्णा फाऊंडेशनच्या माध्यमातून नवापूर तालुक्यातील पूरग्रस्त कुटुंबाला मदतीचा हात देण्याचे ठरवले. रोजच्या वापरात गरजेच्या असलेल्या सोलापूर चादर, बेडशीट्स, टॉवेल, ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

वस्तू वाटपाच्या कार्यक्रमा वेळी आश्रय दुर्ग संस्थेचे अध्यक्ष जयंत. जे. वसावे, नवापूर ग्रामपंचायत समितीचे विस्तार अधिकारी दिलीप कुवर, सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष व बोकाळझरचे सरपंच राहुल गावित, दिलीप गावित (सरपंच-करेघाट), विजूकोकणी (सरपंच - बारी भवरे), किरण गावित (सरपंच - बोरझर), विकास गावित (वाघालपाडा) जयंत गावित (जामनपाडा), कोरो संस्थेचे विपुल गावित, जे. व्ही. गोकल चॅरिटी ट्रस्टचे राजेश वानखडे, शमुवेल गावित, रूपेश जाधव, नितीन गवळी उपस्थित होते.

समाजकार्याला कर्तव्य मानणाऱ्या डॉ. उल्हास वसावे यांनी जे. व्ही. गोकल चॅरिटी ट्रस्ट व क्रिष्णा फाऊंडेशनच्या माध्यमातून ४ वर्षापासून ग्रामस्थांसाठी फिरता दवाखान्याची सुविधा सुरू केली आहे. या समाजकार्याची मनोभावना अंगी असलेल्या डॉ. उल्हास वसावे उपरोक्त संस्थानचे पूरग्रस्त कुटुंबीयांच्या वतीने बोकाळझरचे सरपंच राहुल गावित यांनी आभार मानले.

## परप्रांतीय कामगार भरती विरोधात

## विरोधी पक्षांचा